# JOINT DIRECTOR OF TECHNICAL EDUCATION
## REGIONAL OFFICE, SADAR, NAGPUR.

TELEPHONE NO:0712-2565143 **E-mail:ronagpur.dte@gmail.com** FAX NO:0712-2561663

**गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती सन २०१३-१४ साठी अर्ज भरण्याबाबत संस्थांना सूचना.**

**संबंधित सेस्थांनी आपले सेस्थामध्ये शिकणारे सर्व पात्र अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती सन २०१३-१४ साठीचे अर्ज भरून घ्यावेत.**

१. अल्पसंख्यांकसाठी केंद्र शासनाची मेरिट-कम-मिन्स व राज्य शासनाची शिष्यवृत्ती हया दोनही स्किम वेगवेगळया आहेत. केंद्रशासनाच्या स्किममध्ये **जैन धर्म** येत नाही.

२. पदवी व पदव्युत्तर (तांत्रिक व व्यावसायिक) शिक्षण घेणारे अल्पसंख्यांक विद्यार्थी केंद्र शासनाची मेरिट-कम-मिन्स तसेच राज्य शासनाच्या शिष्यवृत्तीसाठी पात्र आहेत. (कोर्सची यादी वेबसाईटवर दिलेली आहे.) विद्यार्थ्याला फक्त एकाच शिष्यवृत्तीचा लाभ देय आहे. परंतु विद्यार्थी दोनही योजनांमध्ये अर्ज करु शकतात.

३. राज्य शासनाची शिष्यवृत्ती सन २०१३-१४ साठी अर्ज Notification आल्यानंतर घेण्यात येईल आणि या योजनेमध्ये मेडिकल अभ्यासक्रमांचे अर्ज संचालनालय वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई या कार्यालयाकडून मागविण्यात येतात.

४. केंद्रशासनाच्या Merit-Cum-Means Scholarship योजनामध्ये पदविका अभ्यासक्रम येत नसून तो केंद्रशासनाच्या Post Matric Scholarship योजनामध्ये येतो. ज्या संस्था पदविका अभ्यासक्रम चालवतात त्यांना PostMatric Scholarship योजनेत अर्ज करावयाचा असेल तर अशा संस्थांनी उच्च शिक्षण संचालनालय पुणे, (पत्ता संकेतस्थळ- www.momascholarship.gov. in वर देण्यात आलेला आहे.) यांच्याशी संपर्क साधावा.

५. ज्या विद्यार्थ्यांनी ज्या स्किममध्ये लाभ घेतलेला आहे त्याच स्किममध्ये **Renewal** करावे याची दक्षता संस्थेने घ्यावी.दुसऱ्या स्किममध्ये भरावयाचे असल्यास **Fresh** म्हणून अर्ज भरावे लागेल.

६. ज्या संस्थेचे नांव www.momashcolarship.gov.in या वेबसाईटवर Merit-Cum-Means २०१३-१४ अंतर्गत Registered यादीमध्ये नाही, त्या संस्थांनी ताबडतोब जाहिरातीत दिलेल्या कार्यपद्धतीनुसार Registration करुन घ्यावे.

७. यापूर्वी (सन २०११-१२) संस्थेस दिलेल्या ऑफिससाठी Office Login ID व प्राचार्यासाठी AdminLogin ID देण्यात आला होता.यापैकी Admin Login ID बंद करण्यात आला आहे. अर्जाची सर्व प्रोसेस Office Login ID वरून करता येईल. ज्या Registered संस्था Office Login च्या Password विसरले आहे, त्या संस्थांना Forget Password वर Click करुन Registration च्या वेळी Office Login साठी दिलेला E-Mail ID व Mobile Number भरुन System द्वारे Email Id/Mobile No. वर **O.T.P** ( One Time Password) घेता येतो. संस्थांना आलेल्या **O.T.P** द्वारे फक्त एकदा Office Login करता येईल. एकदा Login केल्यानंतर संस्थांनी स्वतःचा Password भरावा. संस्थांना एकदा **O.T.P** आल्यावर, आलेल्या **O.T.P** वापरल्याशिवाय **O.T.P** ची पुन्हा **Request** देता येणार नाही म्हणून संस्थांनी भेटलेला **O.T.P Delete** करू नये.

८. ज्या संस्थाना आधी Registerd केलेल्या Email Id/ Mobile No. मध्ये काही बदल करायचे असेल त्या संस्थांनी जाहिरातीमध्ये दिलेल्या Format मध्ये माहिती भरून Nodal Office ला कळवावे. Nodal Office कडून दिलेल्या Email Id/ Mobile No रजिस्टर्ड झाल्यानंतर, ती संस्थानी बदल केलेला Email Id/ Mobile No द्वारे **O.T.P** ची **Request** करता येईल.

९. आपल्या संस्थेमध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या तसेच सध्या शिकत असलेल्या सर्व अल्पसंख्याक विद्यार्थ्यांची यादी करावी व योजनेबाबत माहिती द्यावी.

१०. प्रथम वर्ष ते अंतिम वर्ष यामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी **मेरिट-कम-मिन्स बेस्ड शिष्यवृत्तीचा** लाभ घेतलेला नाही अशा सर्व विद्यार्थ्यांचे अर्ज, **नवीन अर्ज (फ्रेश)** म्हणून ऑनलाईन पध्दतीने भरुन घेण्यात यावेत.

११. ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेतलेला आहे, आणि त्यांना त्या वर्षी **५० टक्केच्या** वर गुण भेटलेले आहे अशा विद्यार्थ्यांचे अर्ज **नुतनिकरण (Renewal)** म्हणून ऑनलाईन पध्दतीने भरुन घेण्यात यावेत आणि **मागच्या वर्षाचे मिळालेले गुण भरावे.**

१२. जे विद्यार्थी **पदवी अभ्यासक्रमांमध्ये** शिकत आहेत आणि **नव्याने (Fresh)** अर्ज करत आहे अशा विद्यार्थ्यांच्या पात्रता परीक्षेच्या गुणामध्ये **एचएससीचे/ पदविकाचे** गुण भरण्यात यावेत.

१३. जे विद्यार्थी **पदव्युत्तर अभ्यासक्रमामध्ये** शिकत आहेत अशा विद्यार्थ्यांचे **पदवी परीक्षेच्या अंतीम वर्षाचे गुण** पात्रता गुण म्हणून भरण्यात यावेत.

१४. अर्ज Renewal / Fresh साठी आहे, ते तपासून घ्यावे.

१५. विद्यार्थ्यांचे लिंग (मेल/फिमेल) बरोबर भरण्यात यावेत.

१६. भरलेला कोर्स / अभ्यासक्रम आणि त्याचे वर्ष बरोबर आहे हे तपासून घ्यावे.

१७. Online अर्ज भरतावेळी महाराष्ट्राचे १२ जिल्हयांच्या विद्यार्थ्यासाठी आधार नंबर अनिवार्य करण्यात आला आहे. (१.मुंबई शहर, २.मुंबई उपनगर, ३.पुणे, ४.नंदुरबार, ५.अमरावती, ६.वर्धा, ७.औरंगाबाद, ८.गोंदिया, ९.जळगाव, १०.जालना, ११.लातूर, १२.रत्नागिरी.)

१८. विद्यार्थ्याचे स्वतःचे CBS बँक खाते क्रमांक, आय.एफ.एस.सी. कोडसह/ आधार क्रमांक अचूक भरण्यात यावा त्याशिवाय विद्यार्थ्याला शिष्यवृत्तीची रक्कम लवकर अदा करता येणार नाही.

१९. सर्व विद्यार्थ्यांचे अर्ज भरतेवेळी वरील दक्षता अवश्य घेण्यात यावी. कारण भरलेल्या अर्जामध्ये कोणालाही **EDIT करता येणार नाही**.

२०. सर्व अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरुन प्रिंटआऊट काढण्याची सुविधा संस्थेमध्ये उपलब्ध करुन देण्यात यावी.

२१. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज रोजच्या रोज ऑनलाईन पध्दतीने विभागीय कार्यालयाला फॉरवर्ड करण्यात यावेत.

२२. **एका स्किममध्ये** विद्यार्थ्यांचा एकच अर्ज आहे याची सस्थांनी दक्षता घ्यावी. **Duplicate अर्ज** संस्थांनी Online Not Recommended (Reject) करावे. Duplicate अर्ज मंजूरीसाठी येणार नाही याची संस्थांच्या प्राचार्याने दक्षता घ्यावी.

२३. महाराष्ट्रा बाहेरील जे विद्यार्थी आपल्या संस्थेमध्ये शिकत आहेत अशा विद्यार्थ्यांचे अर्ज देखील ऑनलाईन पध्दतीने भरुन घ्यावेत व त्याची हार्डकॉपी विद्यार्थी ज्या राज्याचा रहिवासी आहे त्या राज्यामध्ये पाठवून देण्यात यावी. याबाबतचे राज्याच्या कार्यालयाचे पत्ते संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

२४. एखाद्या विद्यार्थ्यांचा अर्ज नाकारावयाचा असेल तर त्याची कारणे ऑनलाईन पध्दतीने दिलेल्या जागामध्ये अचूक भरण्यात यावी.

२५. विद्यार्थ्यांचे Online भरलेले अर्ज Online Forword करुन अर्जाची हार्डकॉपी आवश्यक ती कागदपत्रे जोडून तात्काळ विभागीय कार्यालयाकडे विहित मुदतीत पाठविण्यात यावी. **मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार करता येणर नाही.**

२६. **संस्थांनी** जर विद्यार्थ्यांचे Online द्वारे आलेले अर्ज विद्यार्थ्यांने Online पाठविलेल्या तारखापासून ३० दिवसांच्या आत आपल्या Login Id द्वारे Online Scruitiny नाही केली तर ते अर्ज आपोआप (Escalated) Concern Regionl Office कडे System द्वारे Forword केले जातील, म्हणून संस्थांनी जसेजसे विद्यार्थ्याकडून अर्ज येतील तसेतसे अंतीम तारखेची वाट न बघता Online Scruitiny करून अर्ज Forword करावे व त्या अर्जाची Hard Copy Concern Regionl Office मध्ये जमा करावी .

२७. सर्व Online UnScruitiny अर्ज या कार्यालयाकडून (Nodal Office) मेरीट लिस्ट जनरेट करण्याच्या आधी Reject करण्यात येईल.

२८. संस्थेमध्ये प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांची यादी या कार्यालयाकडे उपलब्ध आहे जर प्राप्त विद्यार्थ्याचे अर्ज भरले गेले नाही तर त्याची जबाबदारी संबंधित संस्थेच्या प्राचार्यांवर निश्चित केली जाईल व त्यांचेवर कारवाई केली जाईल याची नोंद सर्व संस्था चालकांनी घ्यावी.

२९. सर्व विभागीय कार्यालयाने १५ दिवसांच्या आत त्यांच्या विभागात येणारे सर्व संस्था (Medical, Law,Agriculture,C.A, अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्था धरून) साठी कार्यशाळा/ Orientation programme घेण्यात यावे. विभागीय कार्यालयास जर आवश्यकता भासत असेल तर निश्चित तारिख ठरवून या कार्यालयाच्या अधिकाऱ्यांना ८ दिवस अगोदर कळवून कार्यशाळेसाठी उपलब्ध असल्यास बोलाविता येइल.

Moma scholarship website : http://momascholarship.gov.in/

# राज्यशासनाची अल्पसंख्याक शिष्यवृत्ती

शासननिर्णय क्रमांक अविवि-२०१२/प्र.क्र.३५/का.क्र.६ दि. २१.०५.२०१३ नुसार विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या रकमेसाठी शैक्षणीक शुल्क, विकास शुल्क, प्रयोगशाळा शुल्क, ग्रंथालय शुल्क, जिमखाना शुल्क व इतर शुल्क धरण्यात येईल. एकुण शुल्काच्या जास्तीतजास्त रुपये २५,०००/- देण्यात येईल.

-------------------------XXX--------------------